# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## शिष्यवृत्ती परीक्षा दि. २६ एप्रिल, २०२६

## अधिसूचना

- ✓ प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ४ थी)
  (PRIMARY SCHOLARSHIP EXAMINATION)
- ✓ उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ७ वी)
  (UPPER PRIMARY SCHOLARSHIP EXAMINATION)




महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
पुणे
विद्या गुरुणां गुरुः ।

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

द्वारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (दुसरा व चौथा मजला)
सर्व्हे क्र. ८३२ - ए, फायनल प्लॉट क्र. १७८ व १७९, बालचित्रवाणी जवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४.
Website : www.mscepune.in व https://puppssmsce.in

**अधिसूचना**

**परीक्षा प्राधान्य**

जा.क्र.मरापप/शिष्यवृत्ती/२०२५-२६/६३२१
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ०४.
दिनांक :- ३०/१२/२०२५

**प्रति,**

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषद, सर्व

२. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका

३. शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई (उत्तर / दक्षिण / पश्चिम विभाग)

४. प्रशासन अधिकारी / शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी, म.न.पा. शिक्षण मंडळ

५. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सर्व

**विषय :- प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ४ थी) व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ७ वी) दि. २६ एप्रिल, २०२६ रोजी आयोजित करणेबाबतची अधिसूचना...**

शासनमान्य शाळांमधून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ४ थी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व इयत्ता ७ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी अधिसूचनेत नमूद केलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या व या परीक्षेस प्रविष्ठ होण्यास इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र परिषदेच्या www.mscepune.in व https://puppssmsce.in या संकेतस्थळावर दि. ३०/१२/२०२५ रोजी पासून उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

उपरोक्त परीक्षा दि. २६ एप्रिल, २०२६ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी घेण्यात येईल. परीक्षेचे वेळापत्रक व परीक्षेची सविस्तर माहिती सोबतच्या अधिसूचनेत नमूद करण्यात आली आहे. **प्रत्येक सूचना वाचूनच कार्यवाही करण्याची दक्षता सर्वांनी घ्यावी.**

**सोबत :- अधिसूचना**

**स्वाक्षरीत/-**
**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०४**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | परीक्षेचे वेळापत्रक | ०४ |
| १.१ | प्राथमिक शिष्यवृत्ती (PSE) व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (UPS) परीक्षेचे वेळापत्रक | ०४ |
| १.२ | ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबतचे वेळापत्रक | ०४ |
| २. | शिष्यवृत्ती परीक्षेचे स्वरूप | ०५ |
| ३. | शिष्यवृत्ती परीक्षेसाठी पात्रता | ०५ |
| ४. | परीक्षेचे माध्यम | ०६ |
| ५. | वयोमर्यादा | ०६ |
| ६. | परीक्षा शुल्क | ०७ |
| ७. | शुल्क भरण्याची पध्दत | ०८ |
| ८. | परीक्षा परिषद शाळा सांकेतांक | ०८ |
| ९. | ग्रामीण, शहरी क्षेत्र निकष | ०९ |
| १०. | C.B.S.E., I.C.S.E. व इतर अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या शाळांबाबत | ०९ |
| ११. | बार्टी शिष्यवृत्ती | ०९ |
| १२. | ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठीच्या सर्वसाधारण सूचना | १० |
| १३. | परीक्षा आयोजनाबाबत सर्वसाधारण माहिती | १२ |
| १४. | ऑनलाईन आवेदनपत्र भरताना आवश्यक बाबी / कागदपत्रे | १२ |
| १५. | विद्यार्थ्याचे आधार कार्ड क्रमांकाबाबत | १३ |
| १६. | दि. १७/१०/२०२५ च्या शासननिर्णयातील महत्त्वाच्या बाबी | १४ |

## १. परीक्षेचे वेळापत्रक :-

### १.१ प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ४ थी) व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ७ वी)

**रविवार दि. २६ एप्रिल, २०२६**

| पेपर | विषय | प्रश्न संख्या | गुण | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम भाषा | २५ | ५० | सकाळी ११.०० ते १२.३० |
| | गणित | ५० | १०० | |
| | **एकूण** | **७५** | **१५०** | |
| २ | तृतीय भाषा | २५ | ५० | दुपारी ०२.०० ते ३.३० |
| | बुध्दिमत्ता चाचणी | ५० | १०० | |
| | **एकूण** | **७५** | **१५०** | |

### १.२ ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबतचे वेळापत्रक :-

| तपशील | शुल्क प्रकार | कालावधी |
|---|---|---|
| शाळा माहिती प्रपत्र, आवेदनपत्र व शुल्क ऑनलाईन भरणे. | **नियमित शुल्कासह (With Regular Fee)** | ३० डिसेंबर २०२५ ते ०२ फेब्रुवारी २०२६ |
| | **विलंब शुल्कासह (With Late Fee)** | ०३ फेब्रुवारी २०२६ ते १७ फेब्रुवारी २०२६ |
| | **अतिविलंब शुल्कासह (With Super Late Fee)** | १८ फेब्रुवारी २०२६ ते २३ फेब्रुवारी २०२६ |
| | **अति विशेष विलंब शुल्कासह (With Special Super Late Fee)** | २४ फेब्रुवारी २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२६ |
| **दि. २८/०२/२०२६ नंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन अथवा ऑफलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरता येणार नाही, याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.** | | |

## २) शिष्यवृत्ती परीक्षेचे स्वरूप :-

- प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या दोन्ही प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाचे असतील.
- प्रत्येक पेपरसाठी **A, B, C, D** संचाच्या प्रश्नपत्रिका देण्यात येतील.
- **प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ४ थी) व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ७ वी) या दोन्ही परीक्षांसाठी उत्तरांच्या ४ पर्यायांपैकी एकच पर्याय अचूक असेल.**

## ३) शिष्यवृत्ती परीक्षेसाठी पात्रता :-

१. विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

२. विद्यार्थी शासनमान्य शासकीय / अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / स्वयंअर्थसहाय्यित शाळेत इ. ४ थी किंवा इ. ७ वी मध्ये शिकत असावा.

## ४) परीक्षेचे माध्यम :-

४.१ परीक्षा एकूण सात माध्यमांमध्ये घेतली जाईल.

१. मराठी २. उर्दू ३. हिंदी ४. गुजराती ५. इंग्रजी

६. तेलुगु ७. कन्नड

४.२ उपरोक्त सात माध्यमांशिवाय सेमी माध्यमांचे पुढील सहा पर्याय उपलब्ध आहेत.

१. मराठी + इंग्रजी २. उर्दू + इंग्रजी ३. हिंदी + इंग्रजी ४. गुजराती + इंग्रजी

५. तेलुगु + इंग्रजी ६. कन्नड + इंग्रजी

४.३ प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ४ थी) व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ७ वी) साठी ऑनलाईन आवेदनपत्रात सेमी इंग्रजी हा पर्याय नोंदविणाऱ्या **विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी पेपर १ मधील गणित या विषयाची व पेपर २ मधील बुध्दिमत्ता चाचणी या विषयाची प्रश्नपत्रिका मूळ माध्यम व इंग्रजी माध्यम अशा दोन्ही माध्यमातून देण्यात येईल. त्यामुळे ऑनलाईन आवेदनपत्रातील परीक्षेचे माध्यम निवडताना दक्षता घ्यावी.**

## ५) वयोमर्यादा :-

५.१ या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय दि. ०१ जून, २०२५ रोजी खाली दर्शविलेल्या तक्त्यातील वयापेक्षा जास्त नसावे.

| परीक्षेचे नाव | प्रवर्ग | |
|---|---|---|
| | सर्व प्रवर्ग | दिव्यांग |
| प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ४ थी) | १० वर्षे | १४ वर्षे |
| उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ७ वी) | १३ वर्षे | १७ वर्षे |

५.२ आवेदनपत्रात विद्यार्थ्यांची जन्मतारीख चुकीची नोंदविल्याने विद्यार्थी गुणवत्ताधारक असूनही केवळ सदर चुकीमुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहू शकतो. त्यामुळे मुख्याध्यापकांनी स्वतः शाळेच्या जनरल रजिस्टर / दाखलखारीज रजिस्टरवरून खात्री करुनच जन्मतारीख अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे.

५.३ चुकीची जन्मतारीख नोंदवून विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरल्यास संबंधित मुख्याध्यापकांविरूध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

५.४ अस्तित्वात नसलेली जन्मतारीख रजिस्टरमध्ये नोंदविलेली असल्यास (उदा. ३१ एप्रिल) ती ऑनलाईन आवेदनपत्रात न नोंदवता योग्य त्या कार्यपध्दतीनुसार दुरुस्त करून त्यानंतरच आवेदनपत्रात नोंदवावी.

**५.५ उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या वयोमर्यादेपेक्षा जास्त वय असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरल्यास स्क्रीनवर 'विद्यार्थ्यांचे वय विहित कमाल वयोमर्यादेपेक्षा जास्त आहे, तरीही विद्यार्थ्यास परीक्षेस प्रविष्ठ होता येईल परंतु त्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.' असा संदेश दिसेल. अशा विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेस प्रवेश मिळेल परंतु त्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीत स्थान मिळणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच सदर बाब संबंधित विद्यार्थी व पालक यांच्याही निदर्शनास आणून द्यावी.**

## ६) परीक्षा शुल्क :-

**६.१** शासन निर्णय क्र. प्राउशि/प्र.क्र.२३/२०२५(ई-११४२१७०)/एसडी-५, १७/१०/२०२५ व कार्यकारी समिती सभा क्र. २९, दि. १२/०४/२०१८, ठराव क्र. ४७० नुसार दर पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | शुल्काचा प्रकार | प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ४ थी) | | उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ७ वी) | |
|---|---|---|---|---|---|
| | | बिगरमागास | मागास/दिव्यांग | बिगरमागास | मागास/दिव्यांग |
| १. | प्रवेश शुल्क | रु. ५०/- | रु. ५०/- | रु. ५०/- | रु. ५०/- |
| २. | परीक्षा शुल्क | रु. १५०/- | रु. ७५/- | रु. १५०/- | रु. ७५/- |
| ३. | एकूण शुल्क<br>(दि. ३०/१२/२५ ते ०२/०२/२६) | रु. २००/- | रु. १२५/- | रु. २००/- | रु. १२५/- |
| ४. | विलंब शुल्क<br>(दि. ०३/०२/२६ ते १७/०२/२६) | रु. ५०/- | रु. ५०/- | रु. ५०/- | रु. ५०/- |
| ५. | अतिविलंब शुल्क<br>(दि. १८/०२/२६ ते २३/०२/२६) | **प्रवेश शुल्क + परीक्षा शुल्क + विलंब शुल्क + अतिविलंब शुल्क रु.१०/- प्रतिदिन / प्रति विद्यार्थी याप्रमाणे.** | | | |
| ६. | अति विशेष विलंब शुल्क<br>(दि. २४/०२/२६ ते २८/०२/२६) | **प्रवेश शुल्क + परीक्षा शुल्क + विलंब शुल्क + अतिविलंब शुल्क + अति विशेष विलंब शुल्क रु.२०/- प्रतिदिन / प्रति विद्यार्थी याप्रमाणे.** | | | |
| ७. | **शाळा संलग्नता शुल्क रु.२००/- प्रति वर्ष**<br>**१.** NTS / NMMS परीक्षेकरीता परीक्षा परिषद शाळा संलग्नता शुल्क भरले असले तरीही शिष्यवृत्ती परीक्षेकरीता स्वतंत्रपणे शाळा संलग्नता शुल्क रु.२००/- भरणे अनिवार्य राहील.<br>**२. इ. ५ वी व इ. ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ साठी ज्या शाळांनी शाळा संलग्नता शुल्क भरलेले असेल त्या शाळांना इ. ४ थी व इ. ७ वी साठी पुन्हा शाळा संलग्नता शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.** | | | | |

**६.२ महाराष्ट्र शासनाचा अभ्यासक्रम राबविणाऱ्या (MSCERT) शाळेतील SC, ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कामध्ये सवलत देण्यात आलेली असून, ही सवलत CBSE, ICSE व इतर अभ्यासक्रमांच्या शाळातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लागू नाही.**

**६.३ सर्व अभ्यासक्रमांच्या शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुध्दा परीक्षा शुल्कामध्ये सवलत देण्यात आलेली आहे.**

**६.४ उर्वरित SBC, OBC, OPEN या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्क भरावे लागेल.**

## ७) शुल्क भरण्याची पध्दत :-

**७.१ शाळांसाठी सूचना :-** उपरोक्त शुल्कानुसार शाळांनी सर्व विद्यार्थ्यांचे होणारे एकूण शुल्क ऑनलाईन पेमेंट या पर्यायाची निवड करुन इयत्तानिहाय (इ. ४ थी व इ. ७ वी) स्वतंत्रपणे शक्यतो एकाचवेळी भरावे.

**७.२ जि. प. सेसफंड / मनपा निधीतून शुल्क भरणाऱ्या शाळांसाठी सूचना :-** ज्या जिल्ह्यांमध्ये परीक्षार्थ्यांच्या शुल्काची रक्कम जिल्हा परिषदेच्या सेसफंड / मनपा निधीमधून भरली जाते, अशा शाळांना सदर सुविधा **केवळ नियमित मुदतीपर्यंत म्हणजे दि. ०२/०२/२०२६ रोजीपर्यंतच** उपलब्ध करुन देण्यात येईल. नियमित मुदतीनंतर आवेदनपत्र भरावयाचे असल्यास संबंधित शाळेला विलंब शुल्कासह शुल्क भरण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानुसार शाळांनी स्वतः विलंबासह शुल्क भरणे आवश्यक राहील.

**७.३ जि. प. सेसफंड / मनपा निधीतून शुल्क भरणाऱ्या शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी यांच्यासाठी सूचना :-** ज्या जिल्ह्यांमध्ये सदर परीक्षेच्या शुल्काची रक्कम जिल्हा परिषदेच्या सेसफंड / मनपा निधीमधून भरली जाते, त्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / प्रशासन अधिकारी यांनी शासन निर्णय दि. ११/११/२०२१ नुसार सन २०२१ - २२ च्या परीक्षेपासून शुल्क वाढ झाली असल्याची बाब जि. प. / मनपाच्या संबंधित समितीच्या निदर्शनास आणावी.

आपल्या जिल्ह्यातील नियमित शुल्काच्या मुदतीत आवेदनपत्र भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या शुल्काची एकूण रक्कम तात्काळ उपलब्ध करुन घ्यावी व परिषदेच्या खात्यावर इयत्तानिहाय **ऑनलाईन पेमेंटव्दारे दि. ०३ मार्च, २०२६ रोजी अखेरपर्यंत भरावी.** सदर शुल्क भरण्यास कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. उपरोक्तनुसार शुल्काचा भरणा विहित मुदतीत न केल्यास सदर शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत. **तसेच जिल्हा परिषद / मनपा शाळांना नियमित शुल्काच्या मुदतीनंतरचे (दि. ०२/०२/२०२६ नंतरचे) कोणतेही विलंब शुल्क माफ केले जाणार नाही,** त्यामुळे आपल्या अधिनस्त सर्व शाळांना नियमित मुदतीत आवेदनपत्र भरण्याच्या लेखी सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

## ८) परीक्षा परिषद शाळा सांकेतांक :-

शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ पासून शिष्यवृत्ती परीक्षेचे सर्व कामकाज युडायस कोडनुसार करण्यात येत आहे. **त्यामुळे परीक्षा परिषद शाळा सांकेतांक नोंदविण्याची आवश्यकता नाही.**

## ९) <u>ग्रामीण, शहरी क्षेत्र निकष</u> :-

**९.१** शासन निर्णय क्र. प्राउशि/प्र.क्र.२३/२०२५(ई-११४२१७०)/एसडी-५, १७/१०/२०२५ अन्वये प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी राज्यातील **ग्रामपंचायतीच्या नियंत्रणाखालील** सर्व गावे / वस्तीमधील (लोकसंख्या विचारात न घेता) शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची गणना **''ग्रामीण''** भागात करण्यात यावी. तसेच **नगरपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका व महानगरपालिका परिक्षेत्रातील** (ग्रामपंचायत क्षेत्र अस्तित्वात नसल्यास) शाळांची गणना **''शहरी''** भागात करण्यात यावी. **शाळा ज्या क्षेत्रात आहे तेच क्षेत्र ग्राह्य धरण्यात येईल. गटशिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी यांनी अधिनस्त शाळांच्या क्षेत्राबाबत खात्री करावी.**

**९.२ दि. ३०/१२/२०२५ पासून शिष्यवृत्ती परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यास सुरूवात होणार असल्याने दि. २९/१२/२०२५ या दिनांकास / दिनांकापूर्वी जी स्थिती असेल ती ग्रामीण / शहरी बाबत ग्राहय धरण्यात यावी.**

**उदा :- एखाद्या गावातील ग्रामपंचायतीचे रुपांतर दि. २९/१२/२०२५ या तारखेनंतर नगरपंचायत / नगरपरिषद / नगरपालिका इ. मध्ये झाले असल्यास संबंधित शाळा ग्रामीण क्षेत्रातच ग्राहय धरली जावी.**

## १०) <u>C.B.S.E., I.C.S.E. व इतर अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या शाळांबाबत</u> :-

शासन निर्णय क्र. प्राउशि/प्र.क्र.२३/२०२५(ई-११४२१७०)/एसडी-५, १७/१०/२०२५ नुसार C.B.S.E., I.C.S.E. व इतर अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या शाळेतील विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट होऊ शकतात. **सदर अभ्यासक्रमातील गुणानुक्रमे संपूर्ण राज्यातील पहिल्या १०० विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय व प्रत्येक जिल्ह्यातील पहिल्या २५ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.** गुणवत्ता यादीत स्थान मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाते. तथापि सदर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येत नाही.

## ११) <u>बार्टी शिष्यवृत्ती</u> :-

मा. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या कार्यालयामार्फत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्य प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती' अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सन २०१४ पासून देण्यात येते.

त्यानुसार इ. ४ थी व इ. ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेतील कट ऑफ लिस्टच्या खालील पात्र विद्यार्थ्यांपैकी शिष्यवृत्ती न मिळालेल्या अनुसूचित जाती या संवर्गातील विद्यार्थ्यांची यादी पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मा. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्याकडे मागणीनुसार पाठविण्यात येते.

## १२) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठीच्या सर्वसाधारण सूचना :-

१. प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेस बसण्यास इच्छुक विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे शाळेने ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाची आहेत. ऑफलाईन पध्दतीने आवेदनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत.

२. विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन आवेदनपत्रात भरलेल्या माहितीची पडताळणी / खात्री मुख्याध्यापकांनी स्वतः करावी. याबाबत भविष्यात काही प्रश्न उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहील.

**३. विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन आवेदनपत्रांची प्रिंट परीक्षा परिषदेकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी, ऑनलाईन आवेदनपत्रांची प्रिंट, आवश्यक प्रमाणपत्रे व शुल्क भरलेल्या ऑनलाईन पेमेंटची रिसिट इत्यादी कागदपत्रे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी आपल्या दप्तरी जतन करून ठेवावीत.**

४. ऑनलाईन आवेदनपत्रासाठी विद्यार्थ्यांचा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य राहील.

५. विदर्भातील ११ जिल्ह्यातील पालकांचे वार्षिक उत्पन्न रू.१,००,०००/- पेक्षा कमी असल्यास त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे (तलाठी / तहसीलदार / प्रांत अधिकारी) प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे.

६. विद्यार्थ्यांचे पालक रु.१,००,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणारे भूमिहीन शेतमजूर असल्यास भूमिहीन शेतमजूर असल्याबाबत व रू.१,००,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असल्याबाबत सक्षम प्राधिकारी (तलाठी / तहसीलदार / प्रांत अधिकारी) यांनी दिलेली प्रमाणपत्रे असणे अनिवार्य आहे.

७. मुद्दा क्रमांक ५ व ६ मधील प्रमाणपत्रांची संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्यांच्या स्तरावरुन तपासणी करणे बंधनकारक असून सदर प्रमाणपत्र आपल्या दप्तरी जतन करुन ठेवावे व परिषदेने मागणी केल्यास उपलब्ध करुन द्यावेत.

८. ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यापूर्वी आवेदनपत्र भरण्याबाबतच्या मुद्देनिहाय सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करावे. त्यानंतरच ऑनलाईन आवेदनपत्रे भरावीत.

९. संगणकाची व इंटरनेटची पुरेशी माहिती असलेल्या कर्मचाऱ्यांची / व्यक्तींची ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी मदत घ्यावी.

१०. शाळेमध्ये इंटरनेट कनेक्शन नसल्यास अन्य ठिकाणाहून (इंटरनेट कनेक्शन उपलब्ध असलेल्या शाळा, नेट कॅफे इ.) आवेदनपत्रे भरावीत.

११. नेट कॅफेमधून ऑनलाईन आवेदनपत्र भरल्यास मुख्याध्यापकाने शाळेच्या लॉगीनमधून भरलेली सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करुनच सबमीट करावे. तसेच सर्व विद्यार्थ्यांचे शुल्क भरले गेल्याची खात्री स्वतः मुख्याध्यापकांनी करावी. यासंबंधी भविष्यात काही प्रश्न उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहील.

१२. परीक्षा परिषदेने आवेदनपत्रे भरण्यासाठी कोणत्याही केंद्रास परवानगी दिलेली नाही अथवा प्राधिकृतही केलेले नाही. शाळेने आपल्या सोयीनुसार इंटरनेट कनेक्शन उपलब्ध असलेल्या ठिकाणी ऑनलाईन आवेदनपत्रे भरावीत.

१३. ऑनलाईन आवेदनपत्रे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व https://puppssmsce.in या अधिकृत संकेतस्थळावरुनच भरावीत.

१४. ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यापूर्वी आवेदनपत्र भरण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना आवेदनपत्रातील सर्व मुद्दयांबाबत सविस्तर माहिती देऊन अवगत करावे.

१५. आवेदनपत्र भरण्यासाठी वेगवान इंटरनेट (Broadband) कनेक्शनचा उपयोग करावा.

**१६. आवेदनपत्र भरण्यासाठी शक्यतो गुगल क्रोम, मोझिला फायरफॉक्स ७५ व त्यावरील व्हर्जनच्या इंटरनेट ब्राऊजरचाच वापर करावा. जेणेकरून आवेदनपत्र भरताना कोणतीही तांत्रिक अडचण उद्‌भवणार नाही.**

१७. आवेदनपत्रे भरण्यासाठी शाळांना अकरा अंकी युडायस कोड असणे अनिवार्य आहे.

१८. आवेदनपत्रातील सर्व मुद्दयांची माहिती शाळेच्या रेकॉर्डप्रमाणे अचूक असणे आवश्यक आहे. ऑनलाईन आवेदनपत्रात अचूक माहिती भरणे ही जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची आहे.

१९. आवेदनपत्रातील सर्व अनिवार्य मुद्दयांची (Mandatory Field) माहिती भरल्याशिवाय ऑनलाईन आवेदनपत्र SAVE होणार नाही.

२०. Login Id व Password जतन करून ठेवावेत. ते त्रयस्थ व्यक्तीला देऊ नयेत.

**२१. विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरण्यासाठी आधार कार्ड क्रमांक किंवा आधार एनरॉलमेंट क्रमांक अनिवार्य आहे.**

## १३) परीक्षा आयोजनाबाबत सर्वसाधारण माहिती :-

१. प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका सीलबंद स्वरुपात देण्यात येतील.

२. उत्तरपत्रिकांची तपासणी OMR पध्दतीने केली जाते.

३. **कार्बनलेस उत्तरपत्रिका देण्यात येत असल्याने सदर उत्तरपत्रिकांची डिजिटल स्कॅन कॉपी (छायाप्रत) देण्यात येणार नाही.**

४. उत्तरपत्रिकेत गिरवलेली / खाडाखोड केलेली उत्तरे ग्राहय धरली जाणार नाहीत. एकदा नोंदविलेले उत्तर बदलता येणार नाही.

५. कोणत्याही परिस्थितीत उत्तरपत्रिकेतील वर्तुळ पेन्सिलने रंगवू नये. अशा उत्तरांना शून्य गुण दिले जातील.

६. शिष्यवृत्ती परीक्षेची परीक्षापूर्व कामे, उत्तरपत्रिकांची तपासणी, शिष्यवृत्तीधारकांची निश्चिती, विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका / प्रमाणपत्रे व परीक्षेची सर्व सांख्यिकीय माहिती संगणकावर तयार केली जाते.

## १४) शिष्यवृत्ती परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरताना आवश्यक बाबी / कागदपत्रे खालीलप्रमाणे :-

१. विद्यार्थ्याची फोटोसह स्वाक्षरीची एकत्रित स्कॅन कॉपी (jpg/jpeg/png/bmp format मध्ये 100 kb पेक्षा जास्त नसावी.)

**उदा. :-**

| |
|---|
| **विद्यार्थ्याचा फोटो** |
| **विद्यार्थ्याची स्वाक्षरी** |

२. विदर्भातील ११ जिल्ह्यातील पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पेक्षा कमी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे (तलाठी / तहसीलदार / प्रांत अधिकारी) प्रमाणपत्र. (इ. ४ थी व इ. ७ वीसाठी)

३. विद्यार्थ्याचे पालक रु.१,००,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणारे भूमिहीन शेतमजूर असल्यास भूमिहीन शेतमजूर व रू.१,००,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असल्याबाबत सक्षम अधिकारी (तलाठी / तहसीलदार / प्रांत अधिकारी) यांनी दिलेली प्रमाणपत्रे. (इ. ७ वीसाठी)

४. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांच्या फोटोसह स्वाक्षरीची एकत्रित स्कॅन कॉपी.

**१५) विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांकाबाबत :-**

ऑनलाईन आवेदनपत्र भरताना विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक किंवा आधार एनरॉलमेंट क्रमांक भरणे अनिवार्य असल्याने यापैकी कोणतीही एक माहिती अचूकपणे नमूद करावी.

**प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा रविवार दिनांक २६ एप्रिल, २०२६ च्या कामकाजाबाबतची माहिती वरीलप्रमाणे असून त्यात होणारे बदल वेळोवेळी कळविले जातील. ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत.**

सदर अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व https://puppssmsce.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्वाक्षरीत/-**
**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०४**

**प्रत - माहितीसाठी सविनय सादर**

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. मा. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुख्य कार्यालय, ५ १/२ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
४. मा. सचिव, केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड (CTET), दिल्ली.
५. मा. शिक्षण संचालक, (माध्य. व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. मा. शिक्षण संचालक, (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. मा. शिक्षण संचालक, (योजना) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. मा. उपायुक्त, नवोदय विद्यालय समिती, शेती महामंडळ भवन, दुसरा मजला, बी विंग, २७० भांबुर्डा, सेनापती बापट रोड, पुणे - ४११ ०१६.
९. प्राचार्य, सैनिकी शाळा सातारा, पोस्ट बॉक्स नं. २०, सदर बझार, सातारा - ४१५ ००१.

# दि. १७/१०/२०२५ च्या शासननिर्णयातील महत्त्वाच्या बाबी

# महाराष्ट्र शासन : शिष्यवृत्ती परीक्षा

## सुधारीत माहितीपत्रक (२०२५-२६)

**दि. १७/१०/२०२५ च्या शासन निर्णयामधील महत्त्वाच्या बाबी**

### मुख्य बदल

- **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून परीक्षा स्तर बदलले आहेत:**
  - **पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा:** इयत्ता ५ वी ऐवजी इयत्ता ४ थी
  - **पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा:** इयत्ता ८ वी ऐवजी इयत्ता ७ वी

4th
7th

- **परीक्षेची नवीन नावे:**
  - प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ४ थी स्तर)
  - उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ७ वी स्तर)
- **शिक्षकांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन:** विद्यार्थ्यांच्या यशातून शिक्षकांच्या कार्याचे मूल्यांकन आणि त्यांच्या सेवापुस्तकात नोंद

### पात्रता आणि अटी

- **रहिवासी:** विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा
- **शाळा:** शासनमान्य (सरकारी/अनुदानित/खाजगी) शाळेत इयत्ता ४ थी किंवा ७ वी मध्ये शिकत असावा
- **वयोमर्यादा (१ जून रोजी):**
  - इयत्ता ४ थी: कमाल १० वर्षे (दिव्यांग: १४ वर्षे)
  - इयत्ता ७ वी: कमाल १३ वर्षे (दिव्यांग: १७ वर्षे)
- **गुण:** प्रत्येक पेपरमध्ये किमान ४०% गुण मिळवणे आवश्यक
- **CBSE/ICSE विद्यार्थी:** गुणवत्ता यादीत येतील, पण त्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळणार नाही

### परीक्षा तपशील

- **अभ्यासक्रम:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने शासनमान्यता घेऊन प्रसिद्ध केलेला अभ्यासक्रम
- **स्वरूप:** सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ आणि बहुपर्यायी (MCQs) असतील
- **माध्यम:** मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती, इंग्रजी, तेलुगु, कन्नड या माध्यमांमध्ये उपलब्ध
- **परीक्षा शुल्क:**
  - बिगरमागासवर्गीय: रु. २००/-
  - मागासवर्गीय / दिव्यांग: रु. १२५/-
- **शाळा नोंदणी शुल्क:** प्रत्येक शाळेला रु. २००/- भरावे लागेल

### शिष्यवृत्तीची रक्कम

| इयत्ता ४ थी: | इयत्ता ७ वी: |
|---|---|
| रु. ५००/- दरमहा (३ वर्षासाठी) | रु. ७५०/- दरमहा (३ वर्षासाठी) |

### महत्वाची माहिती

- सन २०२५-२६ हे संक्रमण वर्ष असेल, ज्यात जुन्या (इ. ५ वी / इ. ८ वी) आणि नवीन (इ. ४ थी / इ. ७ वी) दोन्ही इयत्तांच्या परीक्षा होतील
- सन २०२६-२७ पासून फक्त इ. ४ थी व इ. ७ वी साठी नियमित परीक्षा होईल

अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या https://mscepune.in या संकेतस्थळाला भेट द्या.

# शिक्षण हेच भविष्य : महाराष्ट्र शासन शिष्यवृत्ती परीक्षा

## इयत्ता ४ थी आणि इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्वाची घोषणा!



**तुम्ही हुशार आहात, होतकरू आहात, पण आर्थिक परिस्थितीमुळे पुढील शिक्षण कठीण वाटतेय?**

**चिंता करू नका! महाराष्ट्र शासन तुमच्या मदतीसाठी सज्ज आहे. आमच्या प्रतिष्ठित शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये सहभागी व्हा आणि ३ वर्षांसाठी दरमहा इ. ४ थीसाठी रु. ५००/- आणि इ. ७ वीसाठी रु. ७५०/- ची शिष्यवृत्ती मिळवा.**

**आत्मविश्वास वाढ:** स्वतःच्या गुणवत्तेवर शिष्यवृत्ती मिळवल्याचा अभिमान

**आर्थिक आधार:** शालेय गरजांसाठी आणि पुढील वाटचालीसाठी मोठा हातभार

**स्पर्धात्मक तयारी:** लहान वयातच मोठ्या स्पर्धांची तयारी करण्याची सवय

**गौरव:** राज्यस्तरावर सत्कार आणि प्रमाणपत्र मिळण्याची संधी

**पात्रता:** महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शाळेतील इयत्ता ४ थी किंवा इयत्ता ७ वीचे विद्यार्थी

**संपर्क कोणाशी कराल?** त्वरित आपल्या शाळेच्या मुख्याध्यापकांशी संपर्क साधा आणि अर्ज प्रक्रियेची माहिती घ्या.

## आजच पाऊल टाका, उज्ज्वल भविष्य घडवा!

अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या संकेतस्थळाला https://mscepune.in भेट द्या.



# चला, घडवूया उज्ज्वल भविष्य!

## महाराष्ट्र शासनाची 'प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा'

## परीक्षेचे फायदे: का सहभागी व्हावे?

### आर्थिक सहाय्य
शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना ३ वर्षांसाठी भरीव आर्थिक शिष्यवृत्ती मिळेल (इ. ४ थीसाठी रु. ५००/- प्रति महिना आणि इ. ७ वीसाठी रु. ७५०/- प्रति महिना)

### गुणवत्ता आणि प्रतिष्ठा
शिष्यवृत्ती मिळवणे ही विद्यार्थ्यांमध्ये प्रतिष्ठेची बाब मानली जाते

### भविष्यासाठी प्रोत्साहन
ही परीक्षा विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी आणि उच्च शिक्षणासाठी प्रेरित करते

### राज्यव्यापी ओळख
राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार आणि गौरव केला जाईल

### शिक्षकांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन
विद्यार्थ्यांच्या यशातून शिक्षकांच्या कार्याचे मूल्यांकन आणि त्यांच्या सेवा पुस्तकात नोंदी होतील

### सर्वांसाठी संधी
शहरी आणि ग्रामीण भागातील गरीब, हुशार विद्यार्थ्यांसाठी समान संधी

## पात्रता:

- विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा
- तो शासनमान्य शाळेत (इयत्ता ४ थी किंवा ७ वी) शिकत असावा
- वयाची अट लागू आहे (तपशीलवार माहितीसाठी शाळेत संपर्क साधा)

## त्वरा करा!

**ही संधी गमावू नका. आपल्या पाल्याचे भविष्य घडवण्यासाठी आजच आपल्या शाळेच्या मुख्याध्यापकांमार्फत ऑनलाईन अर्ज भरा.**

अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळाला भेट द्या किंवा आपल्या शाळेच्या मुख्याध्यापकांशी संपर्क साधा.